# प्रतिज्ञापत्र

" मांग गुप्त बोलीचा वर्णनात्मक अभ्यास " या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. (मराठी) या परीक्षेसाठी लिहिली आहे. ही प्रबंधिका अथवा तिचा कोणताही अंश मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

कोल्हापूर.

**मोहन गोविंद लोंढे**

(अभ्यासक)

# प्रमाणपत्र

श्री. मोहन गोविंद लोंढे यांनी मांग गुप्त बोलीचा वर्णनात्मक अभ्यास या विषयावर माझ्या मार्गदर्शनाखाली ही प्रबंधिका पूर्ण केली आहे.

ही प्रबंधिका अथवा तिचा कोणताही अंश अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

कोल्हापूर 30 जून 2003

दिनांक

**प्रा. डॉ. राजन गवस**

(मार्गदर्शक)

# ऋणनिर्देश

"मांग गुप्त बोलीचा वर्णनात्मक अभ्यास" हा विषय एम. फिल. च्या शोधप्रबंधासाठी निवडण्याकरिता डॉ. राजन गवस यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून विषय निश्चित केला गेला.

भारतीय समाजव्यवस्थेतील अनेकविध जातिजमातींपैकी अनुसूचित जातिगटामधील 'मांग जात' अंतर्गत वैशिष्ट्यांचा मागोवा घेण्याच्या उद्देशाने या विषयाची निवड केली.

प्रामुख्याने समाजसंस्कृतीची माहिती व्हावी, मांग जातीची माहिती, ऐतिहासिक मागोवा, पूर्वकालीन परंपरा आणि मांग गुप्त बोली याविषयी सखोल माहिती उपलब्ध करण्याचा अभ्यासाचा मुख्य हेतू डोळ्यांसमोर ठेवून एम. फिल. च्या प्रबंधासाठी - "मांग गुप्त बोलीचा वर्णनात्मक अभ्यास " या विषयाची निवड करून डॉ. राजन गवस यांच्या मार्गदर्शनाखाली समाजशास्त्रीय भाषा अभ्यासण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करताना विषयाची निवड करण्यापासून ते प्रबंधाला पूर्णत्व देण्यापर्यंत माझे मार्गदर्शक आदरणीय डॉ. राजन गवस यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे व वेळोवेळी प्रबंध पूर्ण करण्यासाठी दिलेल्या प्रेरणेमुळे हा प्रबंध पूर्ण होऊ शकला. त्यांचा सदैव ऋणी राहणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

त्याचप्रमाणे शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. कृष्णा किरवले यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्यांचेही मी आभार मानतो.

शोधनिबंधाचा अभ्यास करताना डॉ. अशोक बाबर, डॉ. बाबासाहेब घाटगे, प्रा. जी. के. ऐनापुरे, डॉ. शिशिकांत खिलारे, प्रा. एन. पी. भगत यांच्याशी केलेल्या चर्चेचा आणि मार्गदर्शनाचा मला उपयोग झाला. त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

शोधनिबंधाचा अभ्यास करताना मा. ना. लक्ष्मणरावजी ढोबळे, उच्च शिक्षणमंत्री, प्रा. शिवाजीराव कांबळे, प्रा. एच. बी. तांबोळी, प्रा. साहेबराव लोंढे, प्रा. महामुनी यु. एस., श्री. राजीव आवळे यांच्या सहकार्याबद्दलही आभारी आहे.

शोधनिबंधाचा अभ्यास करताना शब्दसंग्रह मिळवून देण्यासाठी सहकार्य करणारे श्री. एल. के. आवघडे सर, एकनाथ आव्हाड, श्री. महादेव वाघमारे, तसेच ग्रंथालय, पद्मभूषण वसंतराव दादा पाटील महाविद्यालय, कवठेमहांकाळ, ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडून उपलब्ध असलेल्या संदर्भ पुस्तकांचे मला अमोल सहकार्य लाभले. त्या सर्वांच्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

**- मोहन गोविंद लोंढे**